# महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

महानिर्मिती

मुख्य अभियंता (प्रकल्प),
चंद्रपूर प्रकल्प,
निर्माण भवन, उर्जानगर, चंद्रपूर –442404.
**Phone:** 07172.220548, **Fax:** 07172.220644.
**E-mail-cgmprojchn@mahagenco.in**

जा.क्र. मु अं/प्र./चं./ दिनांक :

**वृत्तपत्रीय टिप्पणी (तात्काळ प्रसिद्धिसाठी)**

**विषयः चंद्रपूर प्रकल्प संच क्र.९ (५०० मे.वॅ.) येथील कुलिंग टॉवरच्या आगी बाबत.**

चंद्रपूर प्रकल्प संच क्र.९ (५०० मे.वॅ.) येथे मे.बीजीआर कंपनी व्दारा कुलींग टॉवरचे (१८० मीटर) बांधकाम चालू आहे. यामध्ये गरम पाणी थंड करण्याकरिता साधारणतः १३ मीटर उंचीवर पातळ पी.व्ही.सी. (P.V.C.) शीट ठेवलेल्या असतात. या शीटने एका कोप-यात आज दि.०९.०२.२०१५ रोजी सकाळी ९ वाजता पेट घेतल्यामुळे कुलींग टॉवर मधून धुराचे लोळ बाहेर पडले. पी.व्ही.सी. मटेरीअल असल्यामुळे धूर जास्त निघत होता. महानिर्मितीच्या अग्निशमन दलाने त्वरीत कृती करुन सकाळी ९:३० वाजताच आगीवर नियंत्रण मिळविले. १० वाजता आग पूर्णपणे विझविण्यात आली. या आगीत कोणतीही जीवितहानी झालेली नाही.

साधारणपणे १० टक्के पातळ पी.व्ही.सी. शीटचे नुकसान झाले असून त्याची भरपाई करारानुसार मे.बीजीआर कंपनी कडून करण्यात येईल. या आगीमुळे महानिर्मितीस कोणताही आर्थिक फटका बसलेला नसून प्रकल्पाच्या प्रगतीवर सुध्दा या घटनेचा कोणताही अनिष्ट परिणाम झालेला नाही. अद्याप आगीचे कारण स्पष्ट झाले नसून त्या बाबत तपास चालू आहे.

**मुख्य अभियंता (प्रकल्प)**